# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 28.06.2024** **वार – शुक्रवार**

---

**आषाढी वारी**

आषाढी वारीसाठी संत श्री तुकाराम महाराजांच्या पालखीनं आज पंढरपूरकडे प्रस्थान ठेवलं. पहाटेपासूनच प्रस्थान सोहळ्याला सुरुवात झाली. पारंपरिक महापूजा आणि काकड आरती झाल्यानंतर गाथा भजन झालं, त्यानंतर काल्याचं कीर्तन झाल्यावर दुपारी राज्यसभेच्या नवनिर्वाचित खासदार सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत प्रत्यक्ष प्रस्थान सोहळ्याला प्रारंभ झाला. आज पालखी देहुतच इनामदार वाड्यात मुक्कामी असेल. वारी सोहळ्यासाठी देहूमध्ये सुमारे साडेतीन लाख भाविक दाखल झाले असल्याची माहिती सोहळा प्रमुखांनी दिली.

**माऊली प्रस्थान**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींचा पालखी सोहळा उद्या अलंकापुरीतून पंढरीच्या दिशेनं प्रस्थान ठेवणार आहे; त्यासाठी हजारो वारकरी आळंदीत दाखल झाले आहेत. उद्या पालखी सोहळ्याचा मुक्काम आजोळघरी म्हणजे जुन्या गांधी वाड्यातच असेल. रविवारी ज्ञानेश्वर माऊली आणि तुकोबारायांची पालखी पुण्यात दाखल होत आहे.

**पुणे मनपा**

माऊली आणि तुकोबारायांच्या पालखी सोहळ्यासाठी पुणे महापालिकेच्या घनकचरा विभागाने संपूर्ण शहरात दिवसातून तीन वेळा सार्वजनिक स्वच्छतेचं काम करण्याचं नियोजन केलं आहे. वारकऱ्यांसाठी 1 हजार 690 फिरती शौचालयं पुरविण्यात येणार असल्याचं महापालिकेच्या घनकचरा विभागाचे उपायुक्त संदीप कदम यांनी सांगितलं. महापालिकेच्या आणि खाजगी शाळेत मुक्कामाच्या ठिकाणी महिला वारकऱ्यांसाठी शौचालय आणि न्हाणी घराची व्यवस्था करण्यात आली असून महिला वारकऱ्यांना 50 हजार सॅनिटरी नॅपकिन मोफत देण्यात येणार असल्याचंही कदम यांनी सांगितलं.

**एमआयटी**

माऊली आणि तुकोबारायांच्या पालखी प्रस्थान सोहळ्याच्या निमित्ताने पुण्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येत आहे. आळंदी इथलं विश्वशांती केंद्र, एमआयटी आणि श्री क्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समितीनं; लोकशाही, मानवाधिकार, आणि सहिष्णुतेसाठी लोकशिक्षणपर उपक्रम आयोजित केला आहे. हरीभक्तपरायण धर्मराज महाराज हांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत याचं उद्घाटन झालं. संगतीमुळेच जीवनाला आकार येतो आणि वैष्णव संगती असलेल्या माणसाला सुख लाभते, असे विचार धर्मराज महाराज हांडे यांनी यावेळी व्यक्त केले.

**पुरस्कार**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या इंद्रायणीनगर इथल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी बनवलेल्या ड्रेनेज अलर्ट सिस्टीम या प्रकल्पाला आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये 'कोडींग विथ कमिटमेंट' या प्रकारात विशेष पुरस्कार मिळाला आहे. सार्वजनिक परिसरातील गटारं तुंबल्यावर वॉटर फ्लो सेंसर आणि पायथन कम्प्युटर लैंग्वेजच्या साह्याने डिजिटल गजर वाचतो आणि हा संदेश थेट महापालिकेला मिळतो, अशा स्वरूपाचा हा प्रकल्प, इयत्ता सातवीमध्ये शिकणाऱ्या नैतिक इहारे, निकिता थिटे, श्रावस्ती गायकवाड

आणि निकिता वाकचौरे या विद्यार्थ्यांनी तयार केला. लंडनमध्ये पार पडलेल्या या स्पर्धेत 43 देशांमधून साडेचार हजारहून अधिक प्रकल्प सहभागी झाले होते.

**पिंपरी महापालिका**

पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील इयत्ता 10वी आणि 12वी उत्तीर्ण मुलींसाठी महापालिकेच्या वतीने मोफत, निवासी आणि रोजगाराभिमुख पदविका अभ्यासक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. आर्थिक दुर्बल कुटुंबातील विद्यार्थिनींनी या संधीचा लाभ घ्यावा, असं आवाहन अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी केलं आहे.

**पदवी प्रदान**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा 124 वा पदवीप्रदान सोहळा येत्या 3 जुलै रोजी आयोजित करण्यात आला आहे. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष प्रा. टी. जी. सीथाराम आणि ज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा होईल.

**बालगंधर्व**

कलाक्षेत्रात बालगंधर्व रंगमंदिरांचं स्थान अत्यंत महत्वाचं आहे, अशी भावना अभिनेता स्वप्नील जोशी यांनी आज पुण्यात व्यक्त केली. बालगंधर्व रंगमंदिरांच्या 56 व्या वर्धापदिनानिमित्त आयोजित तीन दिवसांच्या सांस्कृतिक महोत्सवाच्या समारोप प्रसंगी जोशी बोलत होते. बालगंधर्व रंगमंदिरांचा वर्धापनदिन साजरा करण्यासाठी पडद्यामागील कलावंत, तंत्रज्ञ यांचा सहभाग आहे हे अत्यंत कौतुकास्पद आहे, असं जोशी म्हणाले.

**पुरस्कार**

प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृती समितीच्या वतीनं देण्यात येणारा प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृती सन्मान या वर्षी प्रसिद्ध राष्ट्रीय कीर्तनकार आणि व्याख्याते चारुदत्त आफळे यांना जाहीर झाला आहे. स्वरानंद प्रतिष्ठानचे प्रकाश भोंडे यांचाही यावर्षी विशेष सन्मान करण्यात येईल. प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या 97 व्या जयंती दिनी म्हणजे येत्या 15 जुलैला पुण्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष प्राध्यापक मिलिंद जोशी यांनी दिली.

**लोकशाही दिन**

पुणे जिल्हास्तरावरील लोकशाही दिन येत्या सोमवारी 1 जुलैला जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी आज ही माहिती दिली.

**पाऊस**

जूनच्या सुरुवातीला पुण्यात जोरदार पाऊस झाल्यानंतर गेल्या काही दिवसांपासून मोसमी पावसानं दडी मारली होती, मात्र जिल्ह्याच्या अनेक भागात गेल्या चार दिवसांपासून पाऊस पुन्हा एकदा सक्रिय झाला आहे. येत्या आठवडाभरात जिल्ह्यात सर्वदूर पावसाचं प्रमाण वाढण्याची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत.उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**